RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ६६] बुधवार, ऑगस्ट १२, २०२६/श्रावण २१, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १००**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उपविभागीय अधिकारी, ठाणे उप विभाग, ठाणे यांजकडून

**उपविभागीय अधिकारी, ठाणे यांजकडून भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ खाली.**

**अधिसूचना**

मौजे घोडबंदर, ता. ठाणे, जि. ठाणे येथील स.नं.१३२/१३अ या जमिनीमधील ३४० चौ.मी. क्षेत्र "नियोजित ६०.०० मी रुंद रस्ता" (सगनाईदेवी मंदिर ते जेसलपार्ककडे जाणारा) या सार्वजनिक प्रयोजनार्थ भूसंपादन.

क्रमांक टिडी/टे-५/भूसं/एलएक्यु एसआर-६९/२०२३/घोडबंदर/ फेरमुदत वाढ/२०२६.—भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ मध्ये नमुद केले आहे की, जिल्हाधिकारी कलम १९ अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत निवाडा देतील आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर, भूमी संपादनाची संपूर्ण कार्यवाही व्यपगत होईल.

परंतु, समुचित सरकारला, त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल अशी तरतूद आहे.

परंतु, आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल.

मौजे घोडबंदर, ता. ठाणे, जि. ठाणे येथील भूसंपादन प्रकरणात प्रारुप/अंतिम निवाड्याची प्रक्रिया प्रशासकीय सौकार्याच्या दृष्टीने मंजुर करण्याकरिता अडचणी येत होत्या. त्यामुळे सदर अधिनियमाचे कलम २५ मधील तरतुदी विचारात घेता १२ महिन्यांच्या कालावधीपर्यंत समूचित शासन यांचे स्तरावरून मुदतवाढ घेणे आवश्यक होते. जर निवाडयास मुदतवाढ न मिळाल्यास सदर प्रकरणात पुन्हा नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागणार होती. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होऊन भूसंपादन प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता होती.

उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये समुचित शासन असलेले मा. जिल्हाधिकारी या नात्याने प्रकरणात १२ महिन्याच्या कालावधीत वाढ करण्याचा असलेला अधिकार वापरुन खालील प्रकरणातील अंतिम निवाडा पारित करण्याच्या कालावधीत मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कलम १९(१) च्या अधिसूचनेच्या कालावधीत दिनांक १५/०७/२०२६ पासून पुढे ६ (सहा) महिन्यांची मुदतवाढ दिलेली असून सदर मुदतवाढीचे अनुषंगाने अधिसूचना निर्गमित करून ती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले आहेत.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

गावाचे नाव- मौजे घोडबंदर, तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.

| अ.क्र. | सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर | संयुक्त मोजणी नकाशा व विवरणपत्रानुसार संपादनाखालील क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | १३२/१३अ | ०-०३-४० |

**अनुसूची- दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | मौजे घोडबंदर, ता.जि.ठाणे येथील सर्व्हे नं.१३२/१३अ या जमिनीमधील ३४० चौ.मी. क्षेत्र "नियोजीत ६०.०० मी. रुंद रस्ता" (सगनाई देवी मंदिर ते जेसलपार्ककडे जाणारा) या सार्वजनिक प्रयोजनाकरीता रस्ता विकसीत करणेकामी भूसंपादन. |
| प्रकल्पाच्या कामाचे वर्णन | मौजे घोडबंदर, ता. जि. ठाणे येथील सर्व्हे नं.१३२/१३अ या जमिनीमधील ३४० चौ.मी. क्षेत्र "नियोजीत ६०.०० मी. रुंद रस्ता" (सगनाई देवी मंदिर ते जेसलपार्ककडे जाणारा) या सार्वजनिक प्रयोजनाकरीता रस्ता विकसीत करणेकामी भूसंपादन. |
| समाजाला होणारा लाभ | रस्ता वाहतूक |
| प्रकल्पाखालील जागेची सद्यस्थिती | सद्यस्थितीत संपादनाखालील क्षेत्र खुले / मोकळे आहे. |

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन- लागू नाही.

**अनुसूची- चार**

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश- लागू नाही.

स्थळ : ठाणे,
दिनांक १०ऑगस्ट २०२६.

**उर्मिला पाटील,**
उपविभागीय अधिकारी,
ठाणे उप विभाग, ठाणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.